नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४६ Issue - 46 | वार बुधवार दि. २ जुलै २०२५ Blow- Wednesday Date 2 July 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## वारीदरम्यान मृत्यू झाल्यास वारकऱ्याला चार लाखांची आर्थिक मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी जाणारे हजारो वारकरी शेकडो मैल अंतर कापत पंढरपुरात येतात . २५० किमीच्या प्रवासात काट्या कुट्यातून,चिखलातून माऊलीचा गजर करत पंढरीच्या वारीला निघतात. यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक म हत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे .यासंदर्भातलं नवं परिपत्रक महसूल विभागाने आज जाहीर केला आहे .



या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्म हत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे.

शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार, विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरता वारी सुरू झाल्याच्या दिनांक पासून म्हणजेच १६ जून ते १० जुलैदरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे . आत्महत्या विषबाधा खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघा-ताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत दिली जाईल .

# विधानभवनात गदारोळ

## सत्ताधारी-विरोधकांत राडा; नाना पटोले एक दिवसासाठी निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानभवनात आज सत्ताध-ारी आणि विरोधकांमध्ये मोठा गद-ारोळ उडाल्याचं पाहायला मिळालं. शेतकऱ्यांबद्दल कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस नेते आणि आमदार नाना पटोले सरकारविरोधात आक्रमक झाले. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे गेले आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलू लागले. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाले आणि अध्यक्षांच्या अंगावर धा-वून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी नाना पटोले यांचे दिवसभरासाठी निलंबित केले आहे.




विधानसभा अध्यक्षांच्या आस-नापाशी जाऊन केलेल्या आक्रमक वक्तव्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नाना पटोलेंवर भडकल्याचं पाहायला मिळालं. विधानसभा अध्यक्षांनाच दोषी धरून त्यांच्या अंगावर धावून जाणं चुकीचं आहे. नानाभाऊ हे स्वत: अध्यक्षपदावर राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांनी अध्यक्षांची माफी मागायला हवी, अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी केली.

मात्र त्यानंतरही नाना पटोले आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. शेतकऱ्यांचा अपम ान करणाऱ्या माणिकराव कोकाटे आणि बबनराव लोणीकर यांच्यावर कारवाई झाल्याशिवाय आणि मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागितल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. अध्यक्षांनी माझं रोज निलंबन केलं तरी मी शेतकऱ्यांचा म ुद्दा सोडणार नाही, अशी भूमिका पटोले यांनी मांडली. दरम्यान, नाना पटोलेंना सभागृहातून दिवसभरासाठी निलंबित केल्याच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांतील आमदारांनी आजच्या कामकाजावर बहिष्कार घातला आहे.

भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी सरकारवर टीका करणाऱ्या तरुणांवर निशाणा साधताना काही दिवसांपूर्वी वादग्रस्त विधान केले. जालना जिल्ह्या-तील परतूर येथे एका कार्यक्रमात बोल-ताना त्यांची जीभ घसरली होती. तुमच्या अंगावरचे कपडे आणि पायातील चप्पल सुद्धा सरकारमुळेच आहे. मोदींनी तुमच्या वडिलांना पेरणीसाठी सहा हजार रुपये दिले, असं ते म्हणाले होते. परतूर येथील सोलर योजनेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात लोणीकर बोलत होते. सोशल मीडियावर टीका करणाऱ्या तरुणांना त्यांनी लक्ष्य केले. ते म्हणाले, सोशल मीडियावर बसलेले चार-पाच कार्टी असतात, त्यांच्या आईचा पगार बबनराव लोणीकरने केला, त्यांच्या बापाचं पेन्शन बबनराव लोणीकरने केलं. नरेंद्र मोदींनी सहा हजार रुपये तुमच्या बापाला पेरणीला दिले. तुम च्या आईच्या, बहिणीच्या, बायकोच्या नावावर लाडक्या बहीण योजनेतून पैसे दिले. तुमच्या अंगावरचे कपडे आमच्या सरकारचे आणि तुमच्या पायातली चप्पल आमच्यामुळेच, हातातलं ते मोबाईलचं डबडं आमच्यामुळेच आहे. आमचंच घेतो आणि आमच्याच तंगड्या वर करतो, असं खालच्या पातळीवरील वक्तव्य लोणीकर यांनी केलं होतं.

## मंदिर समितीकडून दर्शन रांगेचे सूक्ष्म नियोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेचा मुख्य सोहळा दि. ०६ जुलै रोजी संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने श्रींच्या दर्शनरांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. यंदा मंदिर समि तीच्या वतीने दर्शनरांगेचे सूक्ष्म नियोजन करून अत्याधुनिक पध्दतीची दर्शनरांग तयार केली असल्याने दर्शनरांगेतील भाविकांचा प्रवास सुखकर होऊन जलद व सुलभ दर्शन होत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

संपूर्ण दर्शनरांगेत सीसीटीव्ही कॅम ेरे, दिशादर्शक व माहितीचे फलक, भक्तीसंगीतासाठी अत्याधुनिक साऊंड सिस्टीम, लाईव्ह दर्शनासाठी एलईडी व्हॅन व एलईडी टिव्ही, हरवले सापडले केंद्र, फॅब्रिकेटड शौचालये व साफसफाईसाठी जेटींग - सक्षण मशिन, उपजिल्हा रूग्णालय व तालुका वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत आयसीयू, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छता व्यवस्थेकामी पुरेसा कर्मचारी,

**कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके; दर्शनरांगेतील भाविकांचा प्रवास होतोय सुखकर**

अन्नदानेश्वर महाराज व जळगांव सेवा समि ती मार्फत २४ तास अन्नदान, मंदिर समि तीमार्फत मिनरल वॉटर, चहा, तांदळाची व शाबुदाणा खिचडी, सार्वजनिक सुचना प्रसारण प्रणाली, विश्रांती कक्ष, बसण्याची सुविधा, आपत्कालिन व्यवस्थेसाठी आपत्कालिन मार्ग, अग्निशमन व्यवस्था, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र, अत्याधुनिक पध्दतीची विद्युत व्यवस्था, फॅन - कुलर व्यवस्था, मार्गावरील अडथळा दुर करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाची उड्डाणपुले उभारण्यात आली आहेत.

यंदा कायमस्वरूपी ४ पत्राशेडच्या शेजारी १०० ु ४५० फुटाचे अत्याधुनिक एक सलग तात्पुरते पत्राशेड उभारण्यात आले आहे. त्याची उंची १६ फूट असून, स्ट्रक्चर ३३ पिलरचे उभे आहे व त्यावर ६० फूट लांबीची लोखंडी कैची उभी केली आहे. यामध्ये १००ु४५०ु१६ फ ुटात एकच शेड तयार झाले असून एकूण पू-र्वीचे ८ पत्राशेड कव्हर झाले आहेत. त्याची उंची १६ फुट व सलग शेड असल्याने आतमध्ये हवा खेळती राहत असून,



दर्शनरांग देखील जलद व द्रुतगती-ने चालत आहे. याशिवाय, सलग शेड असल्याने भाविकांचे पावसापासून संरक्षण होत आहे तसेच आपत्कालिन दृष्टीने शेडच्या मागील व पुढील बाजूस पुरेसा जागा देखील उपलब्ध ठेवण्यात आली आहे. तसेच या भागातील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी अंडरग्राऊंड स्ट्रॉम वॉटर पाईपलाईन केली असल्यामुळे पा-वसाचे पाणी इतरत्र वाहत नाही. संपूर्ण बॅरीकेटींग व पत्राशेडचे तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. याशिवाय, २४ तास दर्शनाची वेळ, भाविकांच्या हस्ते होणा-या पुजा बंद ठेवणे, घुसखोरी रोखणे, व्हिआयपी व्यक्तींच्या दर्शनावर निर्बंध, मॅन काऊटींग मशिन, अनुभवी कमांडोज नियुक्ती व इतर अनुषंगीक उपाययोजना करण्यात आल्याने व दर्शनरांगेचे सुक्ष्म नियोजन करून दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालून भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास सुखकर होऊन कमीत कमी वेळेत भाविकांना श्रींचे दर्शन घडत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.

## रवींद्र चव्हाण भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष



मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला नवीन प्रदेशाध्यक्ष मिळाला असून रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली. वरळीमध्ये झालेल्या जय्यत कार्यक्रमामध्ये रवींद्र चव्हाणांचे नाव जाहीर करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांच्यासह प्रमुख भाजप नेते उपस्थित होते.

रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे भाजपचे नावाने बारावे अध्यक्ष असतील. मात्र ते विरोधकांचे राजकीय तेरावे घालतील, विरोधकांचे बारा वाजवल्याशिवाय राहणार नाही असं मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार म्हणाले.

रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू नेते म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे नेते अशीही त्यांची ओळख आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम केलं. तसेच देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहिलं. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपचे १२ वे अध्यक्ष म्हणून काम पाहतील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून आणणे आणि भाजप-ला एक नंबरचा पक्ष बनवणे हे त्यांच्यासमोरील आव्हान असेल.

### जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून पालखीचे स्वागत

# अकलूज येथील नेत्रदीपक रिंगण सोहळ्याने भाविकांच्या डोळ्याचे पारणे फेडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /पंढरपूर (उमाका) : जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने पुणे जिल्ह्यातील सराटी येथून आज सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. सोलापूर जिल्हा प्रशासन प्रमुख जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मोठ्या उत्साहाने व आनंदाने पा-लखीचे स्वागत केले व दर्शन घेतले.

चला पंढरीसी जावू, बाप रखुमा देविवरा पाहू, ज्ञानेश्वर माऊली तुकाराम, जय जय रामकृष्ण हरी... असा हरी नामाचा गजर करीत सर्व वारकरी भक्ती रसात न्हाऊन निघाले. जिल्हा प्रवेशानंतर अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात वारकरी भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे नेत्रदीपक असे गोल रिंगण झाले.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी स्वागतासाठी खा-सदार धैर्यशील मोहिते पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश म हानवर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले, उपविभागीय अधिकारी अमित माळी, श्रीमती विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुल, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे उपस्थित होते.

हाती पताका, मुखात अखंड हरी नामाचा गजर आणि विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन भक्तिमय वाता-वरणात आपल्या लाडक्या विठ्ठलाचे रूप पाहण्यास व त्याच्या पायाचे दर्शन घेण्यासाठी पालखी सोहळ्यातील वारकरी पंढरीच्या वाटेवर लगबगीने चालत आहेत. जणू हा भक्तीचा सा-गरच आहे.

नीरा नदी ओलांडून संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे सकाळी ८.३५ वाजता माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे आगमन झाले. यावेळी पालखी रथावर पुष्वृष्टी करण्यात आली तर पोलिस विभागाच्या बँड पथकानेही पालखीचे स्वागत केले. तसेच यावेळी संत तुकाराम महाराजांच्या अश्व आणि पादुकाचे पूजन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पालखी स्वागतापूर्वी पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पा-लखी सोहळ्यास भावपूर्ण निरोप देण्यात आला. तसेच पुणे जिल्हा प्रशासनाकडून सोलापूर जिल्हा प्रशासनाकडे पालखीची भक्तीभावाने देवाण-घेवाण करण्यात आली.



**जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी रथाचे जिल्हाधिकारी यांनी केले सारथ्य-**

पालखी स्वागतानंतर पालखीच्या स्वागत ठिकाणापासू पालखीच्या रथाचे सारथ्य जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम ही उपस्थित होते. पालखी स्वागत सोहळ्यापूर्वी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पालखी मार्गावर तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्ष, वैद्यकीय सेवा कक्ष तसेच आरोग्य केंद्रास भेट देऊन आरोग्य सेवेची माहिती घेतली. व वारकऱ्यांना चांगल्या आरोग्य सुविधा द्याव्यात असे सांगितले.

नगरपरिषदेच्यावतीने पालखीचे स्वागत

अकलूज येथील गांधी चौकात अकलूज नगरपरिषदेच्यावतीने जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच जिल्हा प्रवेश ते सदाशिवराव माने विद्यालय या पालखी मार्गाच्या दोन्ही बाजूने अकलूजकर नागरिकांनी पालखीचे स्वागत केले व दर्शन घेतले.

नेत्रदीपक रिंगण सोहळा:-

जगदगुरु संत तुकाराम महार-ाज पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील पहिले गोल रिंगण अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात झाले. पताका, हांडे-तुळशी, विणेकरी, मृदंग व टाळकरी यांचे रिंगण झाले. तद्नंतर आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांचे पुत्र विश्वतेज यांनी सपत्नीक अश्व पूजन केले. त्यानंतर अश्व रिंगण झाले. अश्वाचे रिंगणी धावणे उपस्थित अकलूजकरांसाठी एक पर्वणीच होती. भक्तिमय वातावरणात पार पडलेला रिंगण सोहळा याची देही याची डोळा अनुभवता आला. येथे भाविक, वारकरी यांच्या डोळ्यांचे पारणे फ ेडणारा नेत्रदीपक असा रिंगण सो-हळा संपन्न झाला. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### योग्य निर्णय

विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी जाणारे हजारो वारकरी शेकडो मैल अंतर कापत पंढरपुरात येतात . २५० किमीच्या प्रवासात काट्या कुट्यातून,चिखलातून माऊलीचा गजर करत पंढरीच्या वारीला निघतात. यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे. शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार, विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरता वारी सुरू झाल्याच्या दिनांक पासून म्हणजेच १६ जून ते १० जुलैदरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे . आत्महत्या विषबाधा खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघाताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत दिली जाईल. दरम्यान अजून एक निर्णय स्वागतार्ह आहे तो म्हणजे एसटी कर्मचाऱ्यांना विनामूल्य भोजन. आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे.

# मराठी माणूसः पराभूत विचार राजकारण कारणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मराठी माणसाचे मन हीच एक मोठी गोष्ट आहे. त्याला भावना आहेत. त्याच्या अभिव्यक्तिला वेग आहे. उत्स्फूर्तता आहे. आपल्या विचाराचा विसर ही त्याला लवकर पडतो. हा मराठी मनाचा दुर्गुण आहे. मराठी माणसाचे तुटक वर्तन आणि एकमेकांपासून तुटलेले मन हे सर्वत्र आहे.त्याला एकसंध आपले प्रश्नच विचार करता येत नाही. त्याची अलिप्त स्वायत्त वर्तन पद्धतीआणि त्यातील मग्नता ही मराठी माणसाची नित्य मनोवृत्ती आहे. ही मराठी माणसाची मनोवृत्ती संकुचितता आणि सतत न्यूनगंडाची भावना ही त्याला ग्रासत असते. असा हा भावनेवर, प्रतिक्रियेवर सार्वजनिक जीवन जगणारा, इतरांच्या सूचना आणि अफवा ऐकून वर्तन करणारा अनुकरणाच्या वाटेवर चालणारा, मराठी माणूस हा विचार कसा करतो ? तो मराठी माणूस शिकतो. तो पदवीधर होतो. नोकरी करतो . शेती करतो. पण मराठी माणसाची प्रश्नांच्या तळाशी जाऊन उत्तर शोधण्याचे वर्तन शिक्षणातून विकसित झाले आहे काय?

मराठी माणसाचा अध्यात्माचा आणि रुढीपरंपराचा पगडा वाढतच चालला आहे का? मराठी माणसाला शिक्षणातून भावनांचा आणि पूर्वग्रहाच्या संशयाचे, ने नीवाचा निपात का करता येत नाही? शिक्षण म्हणजे विचार असे सूत्र त्यास कधी च मान्य का होत नाही?.

शिक्षण म्हणजे पैसा,नोकरी पद आणि प्रतिष्ठा ही मराठी माणसाने शिक्षणाची केलेली अंतिम व्याख्या मराठी माणसाला विचारापासून परावर्त करते. मराठी माणसाचा ज्ञानाच्या विकासाशी विचार प्रक्रियेशी काही संबंधात दिसून येतो का?

मराठी माणूस शिक्षणातून उदारमतवादी, प्रगतीक व अध्यात्म पलीकडे जाऊन यहवादी वर्तन करणारा तयार का होत नाही? मराठी माणसांना कथन, श्रवण आणि वृथाभिमानाचे वेड आहे. असा हा घेतलेल्या शिक्षणाचा अभिमान बाळगणारा मराठी माणूस पदव्यांच्या वाटावर खूप दूरपर्यंत क्वचितच चालतो. पण त्याचा ज्ञान विकास,त्याचा विचार विकास, त्याची संशोधन अभिवृत्ती विकसित झालेली दिसून येते का ?ती विस्तारित होते का? मराठी माणसाला प्रश्न आणि विचार यांचे नाते असते. हे मान्य आहे का? या उलट मराठी माणसाला जात संबध आणि हितसंबंधातील स्वार्थ हा विचारापेक्षा महत्त्वाचा वाटतो. हे खरे आहे काय?

हे वर उपस्थित केलेले अनेक प्रश्न ही मराठी माणसाच्या अध्यात्मिक प्रभावाची मूळ कारणे आहेत.मराठी माणसाचा विचारापेक्षा, व वर्तमानापेक्षा भूतकाळावर आणि सामूहिक वर्तनाच्या प्रतिसादावर जास्त विश्वास आहे .त्यामुळे मराठी माणसाचे भाषेवरील प्रेम हे सुद्धा एक उत्स्फूर्त तात्कालिक दाखवण्याची गोष्ट ठरते. तो मराठी भाषेला आपली ज्ञानभाषा बनवण्याचे प्रयत्न क्वचितच करीत असल्याचे दिसून येते. मुळात ज्ञान, भाषा याची आसक्ती इथे अद्याप निर्माण झाल्याचे मोठ्या प्रमाणात दिसून येत नाही. त्यामुळे मराठी माणसाचे शिक्षण आणि विचार, मराठी माणसाची श्रद्धा आणि विचाराचा गोंधळ, मराठी माणसाची भक्ती आणि उपभोग या सर्व प्रकारच्या वर्तन प्रक्रियेमध्ये आणि विचार प्रक्रियेमध्ये सतत अस्थिरता, गोंधळ आणि विसंगती आढळून येते.या विसंगतीची कारणे इथल्या प्रबोधनात, इथल्या साहित्यात,इथल्या अध्यात्माच्या पसाऱ्यात आहेत. केवळ ही शेरेबाजी नाही. इथले प्रबोधन सतत गुढ अशा आतर्काच्या काठावर जाऊन थांबते. कोणताही विचार आध्यात्मिक लोकशाही, भक्ती क्षेत्रातील क्रांती, अध्यात्म तील मुक्ती असे जड शब्द इथले विचार अनेक छुपे प्रबोधक लोक वारंवार वापरतात. त्यामुळे मराठी माणसाचे विचार विश्व विकसित होत नसल्याचे दिसून येते. मराठी भाषा इतिहासात झालेली विद्रोहाची अनेक बंड ही सुद्धा तत्कालीक संघर्षाची कारणे आहेत ते तत्कालीन व्यवस्थेला विचारलेले प्रश्न आहेत. तरीही त्यांच्या विद्रोहाला, बंडाला इथल्या अध्यात्मिक वाद्यांनी नामसंकीर्तनाची गौरव पूर्ण विशेषणे लावून त्यांनीसमता प्रस्थापित केली. अशी नावे देऊन देवाच्या मार्गातील दलालांनी इथले संतांचे बंड हे क्षमावले आहे. संतांच्या मुखातून विषमतेचे हे जैसे थे समाज वास्तव आम्हाला मान्य आहे असे कथन करून घेतले ले आहे. आमचा सगळा जीवन वाद हा संघर्ष विषमतेच्या विरुद्ध नसून अध्यात्मातील अनामिक मुक्तीसाठी आहे. असे संतांचे कथन,वचन, व अभंग निरूपण प्रवचन करणारे मराठी विचारक मंडळी विद्रोहाची अनेक बंडे इतिहासात गुंडाळून ठेवतात अशी ही मराठी माणसाच्या संघर्षाची प्रेरणा कारणे पराभूत केली गेली असून ही ती पुढे उघड होवू न देता . ती आध्यात्मिक लोकशाहीच्या भाषेने आज ही ते व्यवस्थेविरुद्धचे संघर्ष दडवितात.

विद्रोह म्हणजे प्राचीन व सद्यकालीन व्यवस्थेच्या विरुद्ध उठवलेले प्रश्न होय. हे प्रश्न शोषण कारण शोधतात. हे प्रश्न अत्याचाराची कारणे शोधतात. हे प्रश्न समाजातील विषमता या व्यवस्थेला आव्हान देतात. हे प्रश्नच जर जर अत्याचाराला आव्हान देतात. हे प्रश्न विचारण्याचे मराठी माणसाचे धैर्य शिक्षणातून विकसित का होत नाही?

वर्तमानाच्या जीवनातील असंख्य प्रश्न ही मराठी माणसाची अस्वस्थ वेदना संघर्षात रुपांतरीत काहोत नाही. मराठी माणसाचे प्रश्न, वस्तू आणिस्वार्थाचे हितसंबंधांच्या साखळीचे जातीच्या वर्तुळात फिरत राहणेच चालू असते. आणि पुन्हा आशावादी अपेक्षांच्या सहकार्य मिळण्याच्या प्रतिक्षेत राहणे असाच वर्तन भाव मराठी माणसाच्या विचस्त विश्वात सर्व क्षेत्रात सर्व ठिकाणी आढळून येतो. मराठी माणसाच्या या वर्तनाचे आणि भाषेचे अन्य संबंध आहेत. मराठी माणसाची भाषा ही विचार भाषा अद्याप झालेली नाही. मराठी माणसाला विचार आणि भावना प्रतिक्रिया आणि विचार कृती आणि विचार यातील फरक सतत करून वर्तन करावे. याचे अंतरिक निरंतर वृत्ती विकसित झालेली नाही. मराठी माणसाचे विचाराचे वर्तन विचार विश्लेषणाचा सातत्यपूर्ण प्रयत्न प्रश्न आणि विचार यातून समाजातील उभे राहणारे संघर्ष सोडवण्या साठीचा सामूहिक प्रयत्न हा सुद्धा मराठी माणसाचा सातत्याने स्वतःतून केलेला दिसून येत नाही, त्यामुळे केवळ व्यापक परिणामातून तयार झालेल्या वातावरणाचा अंदाज घेऊन वर्तन करणारा मराठी माणूस हा विचार करणारा का निर्माण होत नाही ? याचा शिक्षण क्षेत्राशी काय संबंध आहे.?

सवर्ण व वरिष्ठ जातींच्या वर्तनाकडे त्यांच्या हितसंबंध साखळीत आपण जोडले जाऊ. अशा सर्व जाती तसा इथला सर्व जनसमूह सतत प्रयत्न करत राहतो.

**क्रमशः**

**– शिवाजी राऊत, सातारा**

# शिक्षक, विद्यार्थी हे दैवत तर शाळा मंदिर आहे : भारती कोळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी :

शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कौतुकात शाळा पातळीवर काम करणाऱ्या शिक्षकांचा मोठा वाटा आहे. शिक्षक व विद्यार्थी दैवत असून शाळा हे मंदिर आहे. नोकरीचा आदर बाळगून तिच्याशी प्रतारणा न करता शेवटपर्यंत एकनिष्ठ राहण्याची अपेक्षा शिरोळच्या गट शिक्षण अधिकारी सौ.भारती कोळी यांनी काढले. साई मंदिर दत्तवाड येथे केंद्रप्रमुख संजय निकम यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित गौरव सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.अध्यक्षस्थानी सेवानिवृत मुख्याध्यापक अशोक कोकणे हे होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की संजय निकम यांनी सेवेत असताना तसेच सेवानिवृत्ती नंतरही विद्यार्थ्यांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. दत्तवाड केंद्रांतर्गत एपीजे अब्दुल कलाम विद्यार्थी गुणवत्ता विकास कार्यक्रमासाठी २१,००० रुपयांची देणगी देणाऱ्या संजय निकम सरांचा आदर्श सर्वांनी घ्यावा.

गौरव मूर्ती केंद्रप्रमुख संजय निकम यांनी आपल्या ३७.६ वर्षांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेवून सहकार्य व मार्गदर्शन केलेल्या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.

शिक्षक नेते राजू जुगळे, सरपंच चंद्रकांत कांबळे, कु. सेजल निकम, संभाजी कदम,दत्तात्रय कमते यांनी मनोगत व्यक्त केले.

दत्तवाड केंद्राच्या वतीने शिरोळ भूषण प्राप्त गट शिक्षण अधिकारी सौ.भारती सुनिल कोळी व गौरवमूर्ती यांचा मानपत्र,पेहराव,शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.




**केंद्रप्रमुख संजय निकम गौरव सोहळा संपन्न**

स्वागत केंद्रमुख्याध्यापक सतिश यळगुडे यांनी तर प्रास्ताविक व मानपत्राचे वाचन दिलीप शिरढोणे यांनी केले. सूत्रसंचलन शरद अवघडी यांनी केले.

याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी अरुणा शहापूरे, विजीतसिंह शिंदे सरकार, मिनाज जमादार, मयूर खोत, बी.वाय.शिंदे, दौलत माने, बाबासाहेब माने, आण्णाप्पा सिदनाळे, डी.एन.सिदनाळे, धनपाल जुगळे,सुरेश पाटील बाळगोण्णावर, शब्बीर नाईकवाडे,प्रमिला सिदनाळे, राजगोंडा पाटील, शांताराम हेमगिरे, बाबुराव पोवार, संजय पाटील, संजय माने, अशोक नेर्ले, सीमा पाटील, प्रमोद पाटील, अमित माने, तेजस वराळे, तलाठी मुजावर,पोलिस पाटील संजय पाटील(टोपाई), आण्णा मुंडे, सुनिल एडके, अर्जुन पाटील, सुरेश पाटील, दिलीप पाटील, स्मिता डिग्रजे, विनायक मगदूम, संतोष जुगळे, सुरेखा कुंभार, संतोष कोळी, संजय कुंभार, मेहबूब मुजावर, यशवंत पेठे, सलीम अत्तार, सुभाष कुरुंदवाडे, रामचंद नंदिकुरळे, शितल चव्हाण, सतिश चव्हाण, राजू ढोणे, पत्रकार बाळासाहेब कोकणे, मिलिंद देशपांडे,मुन्नाभाई नदाफ यांचेसह दत्तवाड ग्राम पंचायत सदस्य, शिक्षक पत संस्था, शाळा व्यवस्थापन समिती, संघटनांचे पदाधिकारी,आजी -माजी सैनिक मुख्याध्यापक, शिक्षक, सीमभागातील शिक्षक, शालेय पोषण आहार ठेकेदार व मदतनीस, ग्रामस्थ, स्नेही, मित्रपरिवार बहुसंख्येने उपस्थित होते.

# आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त इगतपुरी येथील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्यांचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज);शिवसेना तथा युवासेना सचिव,आमदार वरुण सरदेसाई तसेच ईशान्य मुंबई विभाग क्र.०८ चे विभाग प्रमुख सुरेश पाटील तसेच युवा सेना कार्यकारिणी सदस्या राजोल ताई पाटील,युवासेना उपसचिव मंदारजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना घाटकोपर (प)विधानसभेच्या वतीने शनिवार दिनांक २८ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता शिवसेना नेते,युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानडवाडी केंद्र वाघेरे येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.सदर कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना दप्तर,वॉटर बॉटल,कंपास पेटी,टिफीन बॉक्स,पेन,पेन्सिल,रबर,शार्पनरस्केच पेन,छत्री,बिस्कीट पुडा इत्यादी वस्तूंचे वाटप करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मनाला सुखावून गेला.सदर प्रसंगी केंद्रप्रमुख बागड सर,मुख्याध्यापक भामरे सर,युवा विभाग अधिकारी अभिषेक मोरे,युवा उपविभाग अधिकारी अजय मंडलिक,भा.वि.सेना चिटणीस मयुर गाढवे,युवा शाखा अधिकारी वैभव तांबोळी,सागर फुलसुंदर,भा.वि.सेना शाखा संघटक प्रशांत धुमाळ,तसेच सूरज वाघ,लक्ष्मण खळे इत्यादि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाला राजोल ताई पाटील(युवासेना कार्यकारिणी सदस्या)तसेच सुनिल मोरे(शिवसेना उपविभाग प्रमुख)यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## निफाड तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

# शंखी गोगलगायींचा प्रादुर्भाव - निफाड तालुक्यात खरीप पिकांसमोर नवे आव्हान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी :- निफाड तालुक्यातील काही भागांमध्ये खरीप हंगामात सोयाबीन, मका, भाजीपाला तसेच फळबागांमध्ये शंखी गोगलगायींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. सध्याचे ढगाळ वातावरण, सतत पडणारा पाऊस, जमिनीतला भरपूर ओलावा आणि तुलनेने कमी तापमान २० ते ३२ अंश सेल्सियस हे गोगलगायींच्या वाढीसाठी अत्यंत पोषक ठरत आहे. निफाड तालुका कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आणि गोगलगायींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी एकात्मिक नियंत्रण उपाययोजना राबविण्याचे आवाहन केले आहे.

पुढील उपायाचा त्यात समावेश आहेत १) शेतातील बांधांवर व शेतात स्वच्छता ठेवा, जेणेकरून गोगलगायींना लपण्यासाठी जागा मिळणार नाही २) सकाळी किंवा संध्याकाळी गोगलगायी गोळा करून त्यांना साबणाच्या पाण्यात टाका किंवा खड्ड्यात पुरा व चुनखडी पावडर शिंपडा ३) संध्याकाळी शेतात दर २०-२५ फुटांवर गवताचे ढिगारे ठेवा व सकाळी त्याखाली गोगलगायी व अंडी गोळा करून नष्ट करा.४) शेताच्या बांधांवर तंबाखू किंवा चुनखडीची ४ इंच रुंदीची पट्टी शिंपडून गोगलगायींना प्रवेश रोखा.५) झाडांच्या खोडाभोवती तांब्याची पट्टी किंवा प्लॅस्टिकची पिशवी गुंडाळून त्यावर ग्रीस लावा.६) मेटाल्डिहाइड २.५% किटकनाशकाच्या गोळ्या/भुकटीचे (५०-८० ग्रॅम प्रति १०० स्के. फूट) वापर करा ७).गहू/भाताचा कोंडा ५० किलो, ईस्ट, गूळ आणि थायोमिथॉक्झाम २५% यांच्या मिश्रणातून विषारी आमिष तयार करून संध्याकाळी प्रादुर्भावीत भागात टाका.



**सर्व उपाय जून ते सप्टेंबर या पावसाळी कालावधीत २-३ वर्षे नियमित राबवावेत. शंखी गोगलगायींचा प्रसार रोखण्यासाठी कषी विभागाने दिलेल्या सुचनांचे पालन करुन शेतकऱ्यांनी या उपायांचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. वेळेवर नियंत्रण केल्यास पिकांचे आर्थिक नुकसान टाळता येईल**

**-सुधाकर पवार**
**कृषी अधिकारी,निफाड**


# आषाढी वारी पायी दिंडी सोहळा निमित्त दुसरे गोल रिंगण माळशिरसमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माळशिरस : संजय चव्हाण : आषाढी वारी पायी दिंडी सोहळा निमित्त आज माळशिरस येथे दुसरे गोल रिंगण वारकऱ्यांच्या टाळ गजरा मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

वारकरी मोठ्या संख्येने तल्लीन होऊन नाचत होते. मानाच्या सर्व दीडीतील वारकरी भजनात दंग होऊन मोठ्या संख्येने आनंदाने नाचत होते.

माऊली माऊली गजरात भक्त भाविक लोकांनी रिंगणाचा आनंद घेतला.





हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वारकरी भाविकांना आवश्यक सुविधा देण्याससोबतच स्वच्छतेला प्राधान्य

## जिल्हाधिकाऱ्यांकडून शौचालयाची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न होणार आहे. आषाढी यात्रा कालावधीत लाखो वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकरी-भाविकांना प्रशासनाच्या वतीने चांगल्या दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सातत्याने प्रयत्नशील आ-हेत.प्रशासनाकडून चांगल्या सुविधा उपलब्ध करून देत आहे.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः प्रत्येक ठिकाणी जाऊन शौचालयाची व्यवस्था, त्या ठिकाणी पुरेसे पाणी उपलब्ध आहे का? स्वच्छता ठेवण्यात आली आहे का व वारकऱ्यांना शौचालयाचा वापर केल्यानंतर हात धुण्यासाठी हँडवॉश ची ही सोय या ठिकाणी करण्यात आले आहे त्याची पाहणी केली. काही शौचालये स्वतः जिल्हाधिकारी यांनी उघडून पाहणी केली आहे. शौचालय साफसफाई करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ तसेच शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी जेटींग व सक्शेन मशीन उपलब्धता करण्यात आली आहे. सदर वाहनांना विशेष वाहन म्हणून घोषीत केले असल्याने वाहनांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निमर्ण होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.



# सोलापूरचे डाक आवेक्षक मंगेश भेंडे यांचा जयदुर्गादेवी समाजसेवी संस्थेने केला सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

सोलापूर येथील डाक आवेक्षक मंगेश भेंडे यांचा सातन दुधनी येथील जयदुर्गादेवी बहुउद्देशीय समाज सेवी संस्थेच्या वतीने सत्कार करून सन्मानित करण्यात आले.



अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथील जय दुर्गादेवी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था या संस्थेकडून भारतीय डाक घर विभाग सोलापूर डाक आवेक्षक मंगेश भेंडे यांचा सत्कार करण्यात आला मंगेश भेंडे यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र कोळी यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे मुख्याध्यापक यल्लाप्पा माशाळे सहशिक्षक धनंजय कोळी. शाखा डाक पोस्ट मास्तर अश्विनी माने संस्थेचे सदस्य ऐश्वर्या करजगी शातलिंग कुंभार सिद्धाराम करजगी बाळाराजे कोळी आधी उप-स्थित होते. अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथील जय दुर्गादेवी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था सामजिक कार्यात अग्रेसर असून विविध कार्यक्रम राबवून आणि लोकोपयोगी कामे करून सामाजिक योगदान देत आहे असे मत याप्रसंगी सोलापूर येथील डाक विभागाचे आवेक्षक मंगेश भेंडे यांनी व्यक्त केले.

# अनंत चैतन्य प्रशालेलामुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाचा तृतीय पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्याबरोबरच आरोग्य,स्वच्छता ,पर्यावरण, क्रीडा याविषयी जागृती करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना देण्यासाठी व शाळा- शाळांमध्ये स्पर्धा निर्माण करुन या स्पर्धेच्या माध्यमातून शाळा सर्व भौतिक सुखसुविधांनी युक्त व्हाव्यात व विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात शिकता यावे जेणेकरून त्यांची संपादणूक क्षमता वाढावी या महत्वकांक्षी उद्देशा-ने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातील मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अनोखे अभियान १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान राज्य, जिल्हा व तालुका अशा तीन स्तरा-वर राबवले गेले. यात १०० गुणांच्या

मूल्यांकनाच्या आधारे शाळेची पुरस्कारासाठी निवड करण्याचे निकष ठरवले गेले.व या शासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या या प्रेरणादायी उपक्रमात महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर ने सर्व निकष डोळ्यासमोर ठेवून पुर्ण तयारी निशी आपला सहभाग नोंदवला होता व शिक्षण विभागाच्यावतीने मुल्यांकनाकरिता नेमण्यात आलेल्या तज्ञपथकांच्या परीक्षणाच्याद्वारे शाळेची सन २०२३-२४ मधील या पहिल्या टप्प्यातील तृतीय पुरस्कारासाठी निवड झाली.अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वती-ने आयोजित केलेल्या विविध पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमात अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे कर्तबगार आमदार

मा. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांना अक्कलकोट पं. स. शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री.प्रशांत अरबाळे,शिक्षण विस्तार अधिकारी मा. श्री.सोमशेखर स्वामी,पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे,जेष्ठ शिक्षक श्री.शहाजी माने,श्री.सुरेश जाधव,श्री.राजेंद्र यंदे, सौ. स्वप्नाली जमदाडे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी संस्था सुविधा पुरविण्याचे काम करते मात्र दर्जेदार शिक्षण देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांनी अधिक जोमाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन करत सन्मान प्राप्त शाळांचे



कौतुक केले व या प्रेरणादायी योजनेबद्दल शासनाचे आभार मानले.

याप्रसंगी मुख्याध्यापक श्री.अशोक साखरे यांनी हा पुरस्कार शाळा, विद्यार्थी व शिक्षक - शिक्षकेत्तर या सर्वांकरिता अभिमानाची गोष्ट असून यामुळे उस्फूर्तपणे काम करण्याकरिता अधिक बळ प्राप्त होईल असे सांगितले.शाळेने प्राप्त केलेल्या या बहुमानाबद्दल संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी , संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती,सी.ई.ओ.सौ.रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी शुभेच्छासह अभिनंदन केले.



## आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आभाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील विठुराया ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.




# ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कडबनवाडी येथे जिप्सी सफारी उपक्रमाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कडबनवाडी येथील गवताळ प्रदेशामध्ये जिप्सीमधून करण्यात येणाऱ्या सफारी उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. नागरिकांनी या सफारीचा लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

यावेळी वनसंरक्षक आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक महादेव मोहिते,सहायक वनसंरक्षक मंगेश ताटे, इंदापुरच्या वनपरिक्षेत्र अधिकारी भाग्यश्री ठाकूर आदी उपस्थित होते.

श्री. भरणे यांच्या हस्ते पुणे वनविभागाकडून एकूण ३ जिप्सीधारकांना प्रत्येकी १ लाख रुपयाच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले तसेच कडबनवाडी गवताळ प्रदेशाच्या लोगोचे अनावरणही करण्यात आले. श्री. भरणे यांनी कडबनवाडी येथील गवताळ प्रदेशाची स्वतः सफारी केली. नागरिकांनीही या सफारीचा आनंद घेऊन याबाबत इतर नागरिकांपर्यंत माहिती पो-हचवावी, असे आवाहन श्री. भरणे यांनी केले.

यावेळी कडबनवाडी वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जलभूषण भजनदास पवार, सदस्य दाद-ासाहेब जाधव, सरपंच संगिता गावडे, उपसरपंच कडबनवाडी, ॲड. सचिन राउत, फ्रेंडस ऑफ नेचर क्लब, निमगाव केतकी व त्यांचे सदस्य आणि परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# सर्व खाजगी शिक्षण संस्थांची चौकशी करून रोड रोमिओचा बंदोबस्त करा - राहुल हौसलमल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे, शहरातील अनेक शाळा, महाविद्यालये आहेत. ग्रामीण भागातून शिकण्यासाठी मोठ्या संख्येने मुली कळंब शहरात येतात. या विद्यार्थिनींना बस किंवा खासगी वाहनाद्वारे प्रवास करावा लागतो. बसच्या प्रतिक्षेत असणाऱ्या विद्यार्थिनींना अनेकदा रोडरोमियो कडून मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. पोलीस प्रशासने समस्येकडे लक्ष देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा उपाध्यक्ष राहुल हौसलमल यांनी पोलीस निरीक्षक रवी सानप यांना निवेदन देऊन केली आहे.अनेकदा दुचाकी वाहनावरून येणाऱ्या टवाळखोर मजनूकडून मुलींना मानसिक त्रास सहन करावा लागत-ो. असे प्रकार टाळण्याच्या दृष्टिने पोलीस प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. शहरातून शाळा, कॉलेज, ट्युशन जाणाऱ्या मार्गावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था,सावित्रीबाई फुले विद्यालय, विद्याभवन हायस्कूल,जनजागृती शिक्षण महर्षि ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, शिवाजी कॉलेज,रेणुका नर्सिंग विद्यालय, आय टी आय कॉलेज कळंब आहे. आणि प्रायव्हेट शिकवणी वर्ग आहेत. त्यामुळे सकाळी व सायंकाळी विद्यार्थ्यांची वर्दळ असते. शिवाय शाळा सुटल्यानंतर किंवा शिकवणी वर्ग सुटल्यानंतर सायकलने ग्रामीण भागात किंवा घरी जाणाऱ्या विद्यार्थिनींची रोडरोमियो पाठलाग करतात. चौकातही टवाळखोरांचा त्यांना त्रास सहन करावा लागतो. हीच परिस्थिती मांडवकर कोचिंग क्लासेस समोर सर्रास दिसून येते.यापूर्वी काही शाळांच्या प्रशासनाने शाळा सुटण्याच्या व सुरू होण्याच्यावेळी पोलिसांनी सेवा द्यावी, अशी विनंती पत्राद्व-ारे केली होती. या अर्जानंतर काही दिवस येथे पोलिसांची गस्त होती. परंतु काही दिवसानंतर येथे पोलीस राहत नसल्याची संधी साधुन टवाळखोर, मुलींना नाहक त्रास देतात.तसेच खाजगी शिक्षण देणाऱ्या प्रत्येक शिक्षकाची चारित्र पडताळणी करून घ्यावी.

विद्यार्थिनींच्या तक्रारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा उपाध्यक्ष राहुल हौसलमल यांनी मागणीचे निवेदन दिले.या निवेदनावरती राहुल हौसलमल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाउपाध्यक्ष, फादर, अमर गोरे सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्ष आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**क्रीडाप्रेमींसाठी नवे व्यासपीठ उघडले!**

**सर्व साहित्य एकाच छताखाली आणि माफक दरात उपलब्ध**

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉपचे उद्घाटन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जुन्नर/प्रतिनिधी : स्पोर्ट्स आणि ट्रेकिंग क्षेत्रातील सर्व साहित्य एकाच छताखाली आणि माफक दरात उप-लब्ध करून देणाऱ्या 'स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉप' या नव्या व्यावसायिक उपक्रमाचे भव्य उद्घाटन रविवारी, दिनांक २९ जून रोजी जुन्नर येथे उत्साहात संपन्न झाले.

या उद्घाटन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विश्वासराव आरोटे राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व संपादक, दैनिक समर्थ गांवकरी, प.पु. प.म. गोपीराज बाबा बिडकर अध्यक्ष, जुन्नर तालुका महानुभव परिषद, मा. श्री. देवरामशेठ डुकरे सरपंच, पारगांव मंगरुळ तसेच मा. श्री. ज्ञानदेवशेठ डुकरे प्रगतिशील शेतकरी यांच्या शुभहस्ते हा समारंभ पार पडला.




**डॉ. विश्वासराव आरोटे यांचे उद्घाटन प्रसंगी मनोगत:**

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना भावनिक आणि प्रेरणादायी शब्दांत उद्देशून म्हटले, आज मला जुन्नर तालुक्यात येण्याचा योग आला आणि ही भूमी नेहमीच मला आध्यात्मिक आणि प्रेरणादायी वाटते. खरं तर असं म्हटलं जातं की प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका समर्थ स्त्रीचा हात असतो. आजच्या या प्रसंगी आमच्या भगिनी मनिषा भालेकर ताईंनी सुरू केलेल्या 'स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉप' या नव्या व्यवसायाचा उद्घाटन सोहळा माझ्या हस्ते संपन्न होणं ही माझ्यासाठी गौरवाची बाब आहे.

ते पुढे म्हणाले, शिक्षणाबरोबरच खेळही तितकाच महत्त्वाचा आहे. या शॉपचे व्यवस्थापक म्हणून कार्यभार पाहणारे थोरात सर हे अतिशय कर्तव्यदक्ष, ज्ञानसंपन्न, धैर्यशील आणि नैसर्गिक ट्रेकिंगचा समृद्ध अनुभव असलेले व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या अनुभवाचा लाभ पुणे, नगर, नाशिक अशा तीन जिल्ह्यांतील खेळाडूंना मिळणार आहे. त्यांनी खेळासाठी लागणारे साहित्य माफक दरात उप-लब्ध करून जनसेवा हीच ईश्वरसेवा हे तत्त्व प्रत्यक्षात उतरवले आहे.

स्वराज्य शॉप केवळ व्यवसाय नसून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण आहे, असे सांगून डॉ. आरोटे यांनी शॉपच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जिथे जिजाऊ माँ साहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना शिक्षण, शिस्त आणि शौर्याची शिकवण दिली, त्या पवित्र भूमीत हे शॉप सुरू होत आहे हे अत्यंत गौरवाचे आहे. यामुळे येथील युवकांना खेळाच्या क्षेत्रात अधिक संधी मिळतील आणि ते निश्चितच यशस्वी होतील, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, दैनिक समर्थ गांवकरीचे व्यवस्थापक संजय फुलसुंदर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. लवकरच या शॉपच्या संपूर्ण राज्यात शाखा सुरू होतील, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

शॉपमध्ये उपलब्ध साहित्यामध्ये -

सर्व प्रकारचे स्पोर्ट्स आणि ट्रेकिंग मटेरियल

टी-शर्ट व बॅचेस प्रिंटिंग

ट्रॉफीज्, ट्रॅकसूट, फोटो फ्रेम्स

रेनकोट, बॅग्स आदींचा समावेश आहे.

निमंत्रक कु. अनिकेत जनार्दन डुकरे यांच्या संकल्पनेतून उभ्या राहिलेल्या या व्यावसायिक उपक्रमासाठी सह्याद्री वाईल्डलाईफ ट्रेकर्स, स्वराज्य क्रिकेट अकॅडमी, सर्वज्ञ कन्स्ट्रक्शन कंपनी, बळीराजा हायटेक नर्सरी, श्री सिलिंग ॲन्ड इंटेरिअर, श्री मेडीकल पारगाव यांचा मोलाचा सहभाग आहे.

उद्घाटन सोहळा यशस्वीपणे पार पडल्याने सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी पुढील यशासाठी स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉपच्या टीमला शुभेच्छा दिल्या.

# पंढरपूर एमआयडीसी मध्ये उद्योग करण्यासाठी उद्योजकांनी प्रस्ताव पाठवावे : आमदार समाधान आवताडे

## कासेगाव हद्दीत एमआयडीसी होणार; उद्योजक क्षेत्रासाठी उद्योजकांनी मागणी करावी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी:- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने पंढरपूर तालुक्यातील कासेगाव हद्दीत खाजगी २१.५१ हे.आर क्षेत्राम ध्ये लघु ,मध्यम व इतर उद्योजकांसाठी लागणारी जमीन मागणी बाबतचा प्रस्ताव शासनाकडे जास्तीत जास्त उद्योजकांनी पाठवावेत आपण उद्योगासाठी मागणी केल्यानंतरच पंढरपूर तालुक्यातील अनेक दिवस-ापासून चे स्वप्न पूर्णत्वास येणार आहे. यासाठी उद्योजकांनी प्रस्ताव पाठवावे असे आवाहन पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी केले आहे. आ आवताडे यांच्या माध्यमातून साकार होत असलेल्या एमआयडीसी मुळे प्रगतशील व बागायत शेती क्षेत्र असणाऱ्या पंढरपूर तालुक्यातील द्राक्षे, डाळिंब व इतर फळे, पीके उत्पादन मालास आयात-निर्यात तसेच प्रकिया माध्यमातून मोठी व्यावसायिक व उद्योग बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर मोदी सरकार कालखंडात रस्त्यांचे मोठे जाळे निम र्ाण झाल्याने पंढरीत येणाऱ्या वारकरी भाविकांची मोठी गर्दी जमा होत असल्याने येणाऱ्या भाविकांसाठी प्रसाद साहित्य, खेळणी व इतर वस्तू निर्मितीसाठी मोठा वाव मिळणार आहे. पांडुरंग भूमीत उद्योग व्यवसाय केल्याने मोठी आर्थिक संपन्नता प्राप्त होते अशी आख्यायिका असल्याने मतदारसंघातील उद्योजकीय चाके गतिमान होऊन अर्थकारणाला मोठी चालना मिळणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकांनी याबाबतची जाहिरात नुकतीच प्रसिद्धीला दिली आहे. पंढरपूर तालुक्यातील कासेगाव या ठिकाणी औद्योगिक विकास महामंडळाकडून अधिनियम १९६१ मधील भूसंपादन तरतुदीद्वारे औद्योगिक क्षेत्रासाठी खाजगी क्षेत्र २१.५१ हे. आर म ध्ये इच्छुक उद्योजकांनी आपल्या उद्योगासाठी लागणाऱ्या जमिनीची मागणी शासनाच्या नियमानुसार दिलेल्या प्रस्तावा द्वारे आवश्यक कागदपत्रासह करावी. यासाठी इच्छुक उद्योजकांना १८० दिवसाचा कालावधी देण्यात आला आहे. या कालावधीमध्ये पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील जास्तीत जास्त उद्योजकांनी उद्योजक क्षेत्रासाठी ची मागणी करावी अशी जाहिरातही प्रसिद्ध झाले आहे. तरी इच्छुक उद्योजकांनी मोठ्या प्रमाणात याचा लाभ घेऊन पंढरपूर तालुक्याचे अनेक दिवसांपासूनचे अपूर्ण स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी संधीचा उपयोग केला तर पंढरपूर तालुक्यातील एमआयडीसीचे स्वप्न पूर्ण होणार आहे. यासाठी सर्व अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

आतापर्यंत केवळ राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी एमआयडीसीचे नुसते गाजर दाखवण्यात आले होते. परंतु आमदार झाल्यापासून आमदार समाधान आवताडे यांना पहिल्या टर्ममध्ये साडेतीन ते चार वर्षापर्यंत चा कालावधी मिळाला या कालावधीमध्ये वारंवार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व उद्योग मंत्री यांच्याकडे वारंवार पाठवपुरावा करून अशक्य वाटत असलेली एम आय डी सी उभा राहण्याच्या दृष्टीने पूर्णत्वाकडे जात असल्याचे दिसत आहे.

कागदावर असणारी एमआयडीसी प्रत्यक्षात कधी साकार होणार? असा सवाल उपस्थित करुन विरोधकांनी भरपूर टीका केल्या पण अखंड प्रयत्न शांत, संयमी आणि अभ्यासू दृष्टीकोनाच्या स्वभावाने केवळ प्रसिद्धीसाठी न करता मतदार संघातील तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे व बाहेरील छोटे -म ोठे उद्योग पंढरपूर येथे आले पाहिजे यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी अगदी मनापासून प्रयत्न केले व यश संपादन झाले-भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विजयसिंह देशमुख यांनी सांगितले.



## मुंबईत मराठा समाज आरक्षणासाठी २९ ऑगस्टला मंत्रालयावर मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अंतरवाली सराटी महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या आणि घडाम ोडी घडत आहे शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासूनच्या हिंदीच्या विरोधातिकडे विरोधक आक्रमक झाले आहेत.

मनोज जरांगे यांच्याकडून सातत्याने मराठा आरक्षणा-ची उपोषण आणि आंदोलन करण्यात आले आहे. त्यांच्या काही मागण्यांना सरकारने म ान्यता दिली असली तरी त्यांचे पुरेसे समाधान झालेले नाही,

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी आंतरवाली सराटी बैठक बोलवण्यात आली होती या बैठकीला मोठ्या संख्येत मराठा समाजाच्या आंदोलन जमले होते, या बैठकीच्या वेळी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टला मुंबई गाठायची अशी घोषणा केली स्वतःच्या घटना निघायचा आणि न थांबता दोन दिवसात मुंबई जायचं, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.

## जळकोट येथे आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांचा जनता दरबार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजा-पूर तालुक्यातील जळकोट येथे संकल्प ते सिद्धी या आभियाना अंतर्गत तुळजा-पूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शना खाली गणेश सोनटक्के यांच्या संपर्क कार्यालया समोर आमदार राणा जगजी-तसिंह पाटील यांचा जनता दरबार संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस भारतीय जनता पार्टीचे नेते तथा धाराशिव जिल्हा मजुर फेडरेशनचे अध्यक्ष सतिशनाना दंडनाईक यांचा गणेश सोनटक्के यांच्या हस्ते शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे दिपक आ-लूरे, साहेबराव घुगे, रंजना राठोड, विलास राठोड याचांही सत्कार करण्यात आला.या प्रसंगी जळकोट, मुर्टा, होर्टी, चिकुंद्रा, मानमोडी, जळकोटवाडी, हंगरगा (नळ), बोरमन तांडा, गणेशनगर तांडा,आलियाबाद तांडा आदी वाडी वस्ती गावातील जेष्ठ नागरीक महिला उपस्थित होते. जनता दरबारामध्ये जास्त करून जेष्ठ नागरीकांच्या पगारीविषयी व शिधापत्रीका असुनही धान्य मिळत नाही, शेतकऱ्याच्या पगारी आदी विषय जास्त चर्चीले गेले प्रत्येक नागरीक व महिला ह्या आमच्या गेल्या सहा सात महिन्या पासुन पगारी बंद आहेत हाच सुर जनता दरबारामध्ये प्रामुख्याने दिसून येत होता.घरकुलाचा विषय होता त्यामध्ये एक हप्ता मिळाला तर दुसरा हप्ता वेळेत मिळत नसल्याने घर उघड्यावर असल्याचे काही लाभ धारकांनी विषय मांडला. या जनता दरबारासाठी आलेल्या सर्व नागरीकांच्या सर्व समस्या ऐकून घेऊन त्याची कागदपत्रे घेण्यात आले व संबधीत विभागाशी सदर प्रश्नी संपर्क करून व त्या त्या विभागाचे एकदिवशीय मेळावे लावून ह्या सर्व प्रश्नांची योग्य ती कार्यवाही करून आपल्या सर्व समस्या सोडविण्यात येथील असे या जनता दरबारात नागरीकांना सांगण्यात आले. सदर दरबारात आलेल्या सर्व नागरीकांसाठी अल्पउपहार व चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या जनता दरबारास नागरीकांचा प्रतिसाद चांगला मिळला व सर्वाच्या प्रश्नाचे निराकारण करण्यात आले.

यावेळी माजी सरपंच तम्माणाप्पा माळगे, बाळासाहेब पाटील, नागनाथ किलजे, ईराणा स्वन्ने, कस्तुरा कारभारी, इलाही गडीवाले, दामु लोखंडे आदीसह परिसरातील कार्यकर्ते मोठया संख्याने उप-स्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी उत्पन्न बाजर समितीचे चेरमन ॲन्ड अशिष सोनटक्के यांनी केले. तर सुत्रसंचलन अरुण लोखंडे यानी केले व आभार विलास राठोड यांनी मानले.

## भटवाडी येथील फुटपाथवरील अनधिकृत बांधकामाचा बेस्ट बसला अडथळा, मनपा विभागाने फुटपाथवरील अनधिकृत बांधकाम हटवण्याची स्थानिकांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);घाटकोपर पश्चिम भटवाडी येथे मुंबई महानगर पालिकेने भाजी विक्रेत्यांसाठी मंडई बांधून दिलेली अस-लेली तरी देखील हे भाजी विक्रेते तसेच अन्य वस्तू विक्रेते हे रस्त्यावर फुटपाथ वर येऊन आपला बाकडा लावून भाजी व इतर साहित्य घेऊन विक्री करण्यास बसत आहेत.त्यामुळे घाटकोपर स्टेशन वरून येणाऱ्या तसेच कांदिवली,वरळी येथे जाणाऱ्या मोठ्या बेस्ट बसेस यांना वळणावर वळण घेण्यास बेस्ट चालकास मोठी कसरत करावी लागते.परिणामी याठिकाणी अपघात होण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही,त्यासाठी राम जोशी मार्ग रस्ता हा रुंद करण्याची आवश्यकता आहे अशी स्थानिकांची मागणी आहे.तसेच





यासाठी वाहतूक शाखेने देखील यामध्ये महत्त्वाची भूमिका घेऊन लवकरात लवकर कारवाई करावी. रस्ता लहान निमुळता असल्यामुळे बेस्ट बस ला याठिकाणी वळण घेता येत नाही,कारण पुढे फुटपाथवर आलेले अनधिकृत बांधकाम हे महत्त्वाचे कारण ठरत आहे.परिणामी (ता.३० जून) रोजी सकाळी बाबू गेनू मंडई येथील राम जोशी मार्गावर बेस्ट बस नंबर चक०१ - उठ - ३०६१ ही बेस्ट बस वळण घेत असताना बंद पडली.सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.महानगर पालिकेने हे फुटपाथ वरील अनधिकृत बांधकाम खाली करून रस्ता मोकळा करून द्यावा अशी मागणी स्थानिक रहिवाशी यांनी लोकप्रतिनिधी व महानगर पालिका अधिकारी यांच्याकडे करत आहेत.

## नमस्ते नाशिक फाउंडेशन यांची सेवाभावीतून विठ्ठलाची वारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड :

**मस्तक आमचे झुकवुनी तुझ्या पाऊली, नाम घेतो तुझे विठू म ाऊली**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विठ्ठलाची वारी करूया साजरी, अशा भक्तिभावाने आणि सेवाभावाने प्रेरित होऊन जिथे कमी, तिथे आम्ही या ब्रीदवाक्यानुसार नमस्ते नाशिक फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाचोरे बुद्रुक, ता. निफाड, जि. नाशिक येथील गरजू विद्यार्थ्यांना पावसाळी साहित्य (रेनकोट, छत्र्या) आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमामागील उद्देश म्हणजे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये यासाठी मदतीचा हात पुढे करणं. मुलांच्या डोळ्यांतील चमक आणि चेहऱ्यावरील हसू - हाच आमचा खरा सन्मान आहे! फक्त साहित्य नाही, तर स्वप्नांनाही पंख देण्याचा आमचा प्रयत्न आहे! अशा शब्दांत नमस्ते नाशिक फाऊंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल देव यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या उदात्त भावनेतूनच विद्यार्थ्यांना रेनकोट, छत्र्या, शालेय दप्तर, पेन यांसह विविध उपयुक्त साहित्य वाटप करण्यात आले. एकूण २७५ विद्यार्थ्यांना नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्ष स्नेहल देव, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रि. विंग कमांडर प्रदीप बागमार व प्रसिद्ध कॉस्मेटोलॉजिस्ट डॉक्टर पल्लवी बागुल यांच्या हस्ते मुलांना साहित्याचे वाटप करण्यात आले,

कार्यक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रमाप्रसंगी अशोक सावकार, मेघा बागुल, नम्रता सावकार, अरुण निकम-मुख्याध्यापक, सुनील आंधळे, नम्रता ब्राह्मणकर, आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रम पार पाडण्यासाठी थोरात मॅडम, जाधव सर, चोथे मॅडम, आदि शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. श्रीयुत रसाळ सर यांनी मनोगत व्यक्त करताना नमस्ते नाशिक फाउंडेशन या संस्थेचे आभार मानले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी नमस्ते नाशिक फाउंडेशनचे संदीप देव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रवी साळुंके सर यांनी उत्तम प्रकारे पार पाडले.

## कर्मयोगीमध्ये शासनमान्य प्रथम वर्ग बैठक प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्राचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री पांडुरंग प्रतिष्ठा संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे येथे शैक्षणिक वर्ष २०२५ /२६ बीटेक पदवी परीक्षा अभियांत्रिकीच्या पदवी प्रवेशासाठी शास-नाची सुविधा केंद्र सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या सुविधा केंद्राचे मार्गदर्शन घेऊन अचूकपणे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून आपला प्रवेश निश्चित करावा असे श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे प्रमुख रोहन परिचारक यांनी आव्हान केले आहे.

महाविद्यालयामध्ये सुरू करण्यात आलेल्या अभियांत्रिकी २०२५ या प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्राची उद्घाटन उप-स्थित विद्यार्थी व पालक यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील म्हणाले की अभियांत्रिकीची प्रवेश प्रक्रिया ही केंद्रा भूत असल्यामुळे विद्यार्थ्यांना काही ठराविक मूर्तीच्या आत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागते. त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. राज्य सामायिक प्रवेश प्रक्रिया बीटेक साठी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जाते यासाठी कर्मयोगी फॅसिलिटीशन सेंटर म्हणून म ान्यता मिळाली आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असेही त्यांनी सांगितले.

**कर्मयोगी मध्ये ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा**

यावेळी महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया प्रमुख डॉक्टर अभय उत्पाद म्हणाले की सर्वप्रथम प्रवेश प्रक्रिया करण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावी लागते यासाठी मोफत सोय महाविद्यालयामध्ये केले आहे. महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या मार्गदर्शन केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारी सर्व कागदपत्रे व ई बी सी साठी सव-लती मिळण्याच्या बाबत सर्व माहिती याचे पूर्ण मार्गदर्शन मोफत केले जाणार आहे. याची मार्गदर्शन करण्यासाठी डॉक्टर अभय उत्पाद यांच्याकडे संपर्क करावा(९१५८३२५०५५) यांच्याशी संपर्क करून प्रवेश प्रक्रिया अचूक पूर्ण करावी.

ही सुविधा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री रोहन परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील कर्मयोगी पॉलिटेक्निकल म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टार जीडी वाळके, उपप्राचार्य डॉक्टर मुडेगावकर इत्यादी शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

**वंचित असलेल्या लाभार्थ्यांनी कागदपत्राची पुर्णता करावी**

**तहसिलदार विशाल नाईकवाडे यांचे आवाहन**

## संजय गांधी, श्रावणबाळ, निवृत्ती वेतन योजनेचे अनुदान यापुढे डीबीटी पोर्टलद्वारेच मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेतील निफाड तालुक्यातील लाभार्थ्यांना अनुदान अर्थसहाय्य केवळ डीबीटी पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांना सदरचे अनुदान डीबीटीद्वारे मिळत नाही अशा लाभार्थ्यांनी व संजय गांधी, श्रावणबाळ निराधार योजनेच्या लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे ३ जुलै २०२५ पर्यंत त्या त्या गावा-तील तलाठी व महसुल सेवक किवा तहसील कार्यालयाच्या संजय गांधी निराधार योजना शाखेत जमा करावी, असे आवाहन निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. योजनेतील लाभार्थ्यांची विहीत विवरण पत्रात माहिती भरून डीबीटी पोर्टलवर अपलोड करून वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांचे सर्व लाभ तातडीने डीबीटीमार्फत लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा करण्याच्या सूचना राज्य शासनाने




दिल्या असून त्यानुसारच संजय गांधी, श्रावणबाळ या योजनांचे आता अन-ुदान वर्ग करण्यात येत आहे.त्यानुसार जिल्हास्तरावरून पोर्टलवर ऑन बोर्ड (आधार व्हॅलिडेट झालेल्या व आधार व्हॅलिडेट न झालेल्या) लाभार्थ्यांना यापुढील अर्थसहाय्य डीबीटी पोर्टलमार्फत देण्यात येणार आहे. तसेच ऑन बोर्ड नसलेल्या लाभार्थ्यांना पूर्वीच्याच पारंपरिक पद्धतीने (बिम्स प्रणालीद्वारे) अर्थसहाय्य वितरित करण्यात येते. बिम्स प्रणालीद्व-ारे अर्थसहाय्य वितरणाची सुविधा आत्तापर्यंत सुरु होती पन आता संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान अर्थसहाय्य केवळ डी.बी. टी. पोर्टलवर ऑन बोर्ड आधार वैध झालेल्या लाभार्थ्यांनाच करण्यात येणार आहे. तर उर्वरित ऑन बोर्ड आधार वैध नसलेल्या तसेच डीबीटी पोर्टलवर लाभार्थ्यांची नोंदणी न झालेल्या लाभार्थ्यांनी अर्थसहाय्या पासून वंचित राहू नये म्हणून यासाठी लाभार्थ्यांनी आपले अद्ययावत आधारकार्ड, बँक खाते क्रमांक, आधार व बँक खात्याशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक, प्रम ाणपत्र तसेच जीवन प्रमाणपत्र आदींची छायाप्रत ३ जुलै २०२५ पर्यंत संजय गांधी निराधार योजना शाखेत सादर करावी. अन्यथा संपूर्ण माहितीची ऑनलाईन डी.बी.टी. पोर्टलमध्ये नोंद घेता येणार नाही. नोंद न झाल्यास संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योज-नेचा लाभ बँक खात्यावर शासनाकडून जमा करणे शक्य होणार नाही. तसेच याबाबत नंतर लाभार्थ्यांची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, परिणामी अनुदानापासून वंचित राहावे लागू नये यासाठी प्रत्येक लाभार्थ्यांनी खबरदारी घेऊन संबंधित विभागास अद्यावत माहिती द्यावी.

> संजय गांधी निराधार श्रावणबाळ, या लाभार्थ्यांना या पुढील काळात डीबीटी पोर्टलद्वारे अनुदान वर्ग करण्यात येणार असल्याने ज्या लाभार्थ्यांना अनुदान डीबीटीद्वारे मिळत नाही अशा सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले आधारकार्ड, बँक खात्याशी संलग्न मोबाईल क्रमांक, प्रमाणपत्र, आदी कागदपत्रांची पूर्तता तहसिल कार्यालयातील संजय गांधी निराध-ार योजनेच्या कार्यालयात अथवा गावातील तालाठी कार्यालय येथे जमा करून प्रशासनास सहकार्य करावे.जेणेकरून कोणताही लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही
>
> **-विशाल नाईकवाडे (तहसीलदार- निफाड)**